**नियमित दिवाणी दावा क. ६०२/२०१७ मधील निशाणी १६ वरील आदेश**

०१. वादीं तर्फे हा अर्ज आदेश २६ नियम ०९ दिवाणी संहिता प्रक्रिये अंतर्गत न्यायालयीन आयुक्त नेमणूक करण्यासाठी दाखल केला.

०२. वादींचे थोडक्यात म्हणणे असे की, वादींनी प्रतिवादींविरुध्द अतिक्रमण जमिनीचा कब्जा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. यातील प्रतिवादीं यांनी वादीच्या दावा मिळकतीत सुमारे ० हे. ३० आर. क्षेत्राचे अतिक्रमण केले आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीवर केलेले अतिक्रमण नाकारत आहेत. त्यामुळे, वादी यांना दावा मिळकत जमीन गट क. ८७० ची तज्ञ मोजणीदार उप—अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्यामार्फत होवून अतिक्रमित क्षेत्राचा नकाशा अभिलेखावर येणे जरुरीचे आहे. जर सदरचा नकाशा कोर्टात न आल्यास वादी यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. वादी हे मोजणी फी भरण्यास तयार आहेत. त्यामुळे दावा जमीन गट क. ८७० च्या पोट हिश्याची मोजणी उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी, ही विनंती.

०३. या अर्जास प्रतिवादी क. १, २ आणि ४ यांनी आपले म्हणणे निशाणी कमांक १६ खाली मांडले. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादींचा अर्ज हा खोटा व बेकायदेशीर असून, यातील प्रतिवादींस मान्य व कबूल नाही. वादीच्या अर्जातील कथन खोटे असून, कायद्याला धरुन नाही, त्यामुळे वादींचा नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुद्दयांस आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| ०१ | वादींनी मागणी केल्याप्रमाणे वाद जागेचे मोजमाप करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून उप—अधिक्षक भुमी अभिलेख सांगोला यांची नेमणूक करण्यासाठीचे संयुक्तिक कारण अर्जात दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या हक्कात आहे का? | *..होकारार्थी* |
| ०२ | कोणता आदेश ? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ व २:—**

०५. वादीं व प्रतिवादींच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाखल असलेले सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींचे विद्वान वकिल श्री. जी. एन. पाटील यांनी त्यांच्या युक्तिवादात असे सांगितले की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमित जमिनीचा कब्जा मिळणेसाठी व दावा जमिनीच्या मोजणीच्या हद्दीखुणा कायम होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी वादींच्या मिळकतीमध्ये सुमारे ३० आर क्षेत्राचे अतिक्रमण करुनही सदरची बाब प्रतिवादी हे नाकारात आहेत. त्यामुळे, अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०६. प्रतिवादींचे विद्वान वकिल श्री. आर. जी. बाबर यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले आहे की, सदरचा दावा आणि त्यातील कथने खोटे असून, प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

०७. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकले नंतर दाखल असलेल्या कागदपत्राचे व म्हणणे यांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमित जमिनीचा कब्जा मिळणेसाठी व दावा जमिनीच्या

मोजणीच्या हदद्दीखुणा कायम होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच प्रतिवादींनी हजर होवून अतिक्रमण केल्याबाबत स्पष्टपणे नाकारले आहे.

०८. प्रत्यक्ष दावा हा अतिक्रमण जमिनीचा कब्जा मिळणेसाठी व हद्दीखुणा बाबतचा असल्या कारणाने, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये उप—अधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून दावा मिळकतीची मोजणी केल्यास अतिक्रमण प्रतिवादींनी केले आहे किंवा नाही, ही बाब न्यायालयासमोर येणार आहे. तसेच, दावा निकाली करण्यास न्यायोच्या दृष्टीने मदत होणार आहे. वादींच्या वाद मिळकती व प्रतिवादींच्या मिळकती एकत्रात मोजणी केल्यास दाव्याचा वाद संपणार आहे व दाव्याचा अंतिम निर्णय घेताना मदत होणार आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादींच्या दावा मिळकतीची संयुक्त मोजणी करणे न्यायोचित ठरेल म्हणून मी सद्य परिस्थितीत वाद मिळकतीची मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्ताच्या नियुक्तीची आवश्यकता आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देवून व मुद्दा क्र. २ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. उपअधिक्षक भूमी अभिलेख सांगोला यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून दावा मिळकत गट क्रमांक ८७० च्या पोट हिश्याची मोजणी करण्यासाठी वाद पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे मोजमाप करुन जर अतिक्रमीत असेल त्याबाबतचा सविस्तर अहवाल नकाशा सोबत दिनांक ०६/०२/२०१९ पर्यत किंवा पूर्वी दाखल करावा.

०३. वादींना आदेशित करण्यात येते की, उप—अधिक्षक भूमी अभिलेख सांगोला येथील कार्यालयात मोजमापाबाबतचे फी दिनांक १०/०१/२०१९ पर्यत किंवा पूर्वी भरावी.

०४. वादींना पुन्हा असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वाद मिळकत गटाचा नकाशा मोजमापासाठी उप—अधिक्षक भूमी अभिलेख सांगोला येथील कार्यालयात दिनांक १०/०१/२०१९ पर्यत किंवा पूर्वी दयावे.

०५. याबाबत, उप—अधिक्षक भूमी अभिलेख, सांगोला आणि पक्षकारांना योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात यावे.

०६ खर्चा बाबत कोणताही आदेश नाही.

**( आर. बी. खंदारे )**

दिनांक : ०२/०१/२०१९

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर,
सांगोला

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. K. Torane |
| (b) | Court | : | Shri. R. B. Khandare,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 02.01.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 07.01.2019 |